ORIGINAL ARTICLE

ISSN:- 2231-5063

Golden Research Thoughts

*सांराश*

2011 च्या शिरगणतीनुसार भारतातील 68.8 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहात आहे. या ग्रामीण लोकसंख्येची उपजिविका प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. कारण या क्षेत्राचा भारतातील रोजगाराचा वाटा फार मोठा आहे. देशा अंतर्गत स्थुल उत्पन्नाचा शेती क्षेत्राचा वाटा 1960 मध्ये 47.7 टक्के होता. तर 1970.71 मध्ये 41.7 टक्के, 1980-81 मध्ये 35.6 टक्के, 1990-91 मध्ये 29.5 टक्के, 2000-01 या वर्षी 22.3 टक्के तर 2010-11 या वर्षी 14.4 टक्के व 2011-12 या वर्षी 13.9 टक्के होता. या वरुन लक्षात येते की, देशा अंतर्गत स्थुल उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा दिवसेंदिवस कमी–कमी होत आहे. या क्षेत्रातील देशा अंतर्गत स्थुल उत्पन्नाचा दर वेगाने वाढविण्याची आवश्यकता आहे. कारण त्यामुळेच इतर क्षेत्रातील वाढ आणि अर्थव्यवस्थेचा एकूण विकास साध्य होईल. महत्वाचे म्हणजे औद्योगिक क्षेत्रातील जास्तीत जास्त कच्चा माल कृषी क्षेत्र उपलब्ध करुन देते.

# '' भारतातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची कामगिरी '' कालखंड 2002-03 ते 2011-12

*के.बी.गिरासे*

सहयोगी प्राध्यापक, ग.तु.पाटील महाविद्यालय, नंदुरबार.



*प्रस्तावना :*

भारतीय अर्थव्यवस्थेचा कृषी हा मुख्य आधार आहे. म्हणून भारताच्या समृध्दीसाठी कृषी क्षेत्राची समृध्दी हा एकच पर्याय आहे. कारण आज ग्रामीण लोकसंख्येची आकडेवारी पाहता 80 टक्के लोकसंख्या आपल्या उत्पन्नाच्या 41 टक्के खर्च अन्नधान्यावर करीत आहे. तर हेच प्रमाण शहरी लोकसंख्येच्या बाबतीत 22 टक्के आहे. ''ब्रिक्स देशांचा अनुभव असे सूचीत करतो की, कृषी क्षेत्रात एक टक्क्यांची वृध्दी तर इतर क्षेत्रात सारख्याच वृध्दीच्या तुलनेत दोन ते तीन टक्के गरीबी कमी करण्यास अधिक प्रभावी असते.'' म्हणून मागील दोन पंचवार्षिक योजनांमध्ये स्पष्ट केले आहे की, अर्थव्यवस्थेच्या 9 टक्के वृध्दीसाठी कृषी क्षेत्राची वृध्दी कमीत कमी 4 टक्के दराने असावी. मात्र कृषीसाठी कर्जाची व्यवस्था होणेही तेवढेच महत्वाचे आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था संपूर्ण सहकाराच्या इमारतीचे खांब मानल्या जातात. कारण कृषी पतपुरवठा संस्था या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी कृषी पत विषयीच्या मुख्य स्त्रोत राहिल्या आहेत व आजही ग्रामीण शेतकरी कृषी पतसाठी या संस्थांना प्रथम पसंती कम देतात.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कृषी क्षेत्राची प्रगती झाली मात्र हरीत क्रांतीनंतरच कृषी क्षेत्राचा विकास जलद गतीने झाला. 1960 नंतर कृषी उत्पादनाची अल्प किंमत, अल्प कृषी उत्पादन क्षमता यामुळे अनेक अडचणी आल्या. मात्र भारतात 'हरीत क्रांती' चा उपयोग करण्यात आल्यानंतर भारतीय शेतीच्या (कृषी क्षेत्रात) परिस्थितीत फार मोठा बदल झाला. 1960 मध्ये भारतीय कृषी क्षेत्राला हरीत क्रांतीची ओळख झाली. थोडक्यात भारतीय शेतीतील आमुलाग्र बदलाचा तो काळच म्हणता येईल. परिणामी भारतीय शेतीतील बऱ्याच अडचणी टप्याटप्प्याने दुर होऊ लागल्या व प्रचंड लोकसंख्येला भेडसावणारी अन्नधान्याची समस्या कमी होऊ लागली.

स्वातंत्र्यानंतर भारतीय शेतीत अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यात मुख्यत्वेकरुन सिंचनाची फारच मर्यातिद व्यवस्था किंवा सोयी, निकृष्ट दर्ज्याची बियाणे, रासायनिक खतांची मागणीपेक्षा फारच अल्प मात्रा इत्यादी. मात्र हरीत क्रांतीनंतर व भारत सरकारच्या एका पाठोपाठ राबविण्यात आलेल्या पंचवार्षिक योजना यामुळे या समस्या कमी होण्यास मदत झाली. भारतीय शेतीला अनेक समस्या असल्या तरी महत्वाची समस्या होती ती शेतीला पतपुरवठयाची 75 टक्के पेक्षा जास्त शेतकरी आपल्या शेतीच्या मशागतीसाठी सावकारांकडून कर्ज घेत होते. सावकारांचा कर्जावरील व्याजाचा दर फारच जास्त होता. त्याचा परिणाम असा होत होता की, शेतकऱ्यांना आपली आर्थिक परिस्थिती भरमसाठ व्याजामुळे टिकवून ठेवणे शक्य नव्हते. ही समस्या सोडविण्यासाठी विशिष्ट व्यवस्थेची गरज होती. शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या कृषी मालाची 75 टक्के पेक्षा जास्त रक्कम सावकारांचे व्याज परत करण्यातच जात होती. शेतीची रात्रंदिवस मशागत करुन व वर्षभर कष्ट करुनही शेतकऱ्यांच्या हातात नाममात्र रक्कम शिल्लक राहत होती. शिल्लक रक्कमेत ते आपला चरितार्थही चालवू शकत नव्हते.

भारतीय रिझर्व्ह बँकेची 1935 मध्ये स्थापना झाली. त्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने सहकारी पतपुरवठा संस्थांचा विकास आणि वृध्दीसाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन केला. त्याचा फायदा सहकाराच्या माध्यमातून आज शेतीला पतपुरवठयाच्या सोयी उपलब्ध झाल्या. कारण शेतीसाठी पतपुरवठा फार महत्वाचा आहे. भारतात फक्त चार महिनेच पावसाळा असतो. या चार महिन्याच्या दरम्यान शेतीच्या मशागतीसाठी पतपुरवठयाची महत्वाची भुमिका असते.

शेतकऱ्यांची आर्थिक पार्श्वभूमी पाहता कोणीही पतपुरवठा करण्यास तयार होत नाही. कारण शेतकऱ्यांकडून कर्जाची परतफेड होण्याची कोणतीही हमी नसते व दुसरे कारण शेतकऱ्याला शेतीपासून उत्पन्न मिळेलच याची हमी नसते. अशा परिस्थितीत आज शेतकरी प्राथमिक कृषी पतपुरठा सहकारी संस्थाकडून पतपुरवठा प्राप्त करु शकतो. या पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याचे काम करतात. 1912 मध्ये सहकारी संस्थांचा अधिनियम झाला. या अधिनियमाव्दारे अशा संस्थांची नोंदणी करण्याची परवानगी देण्यात आली. अशा संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेंशी संलग्न करण्यात आल्या आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राज्य सहकारी बँकेंशी संलग्न करण्यात आल्या. प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था शेतीच्या कामासाठी अल्प व मध्यम कालावधीसाठी कर्जपुरवठा करतात. सदर पेपर हा भारतातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची कामगिरीचे मूल्यमापन करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात येत आहे.

*संशोधन पध्दती :–*

सदर संशोधन पेपर तयार करतांना नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को–ऑपरेटिव्ह बॅक लि.मुंबई आणि सरकारी नोदींचा उपयोग करण्यात येईल. तसेच विषयांशी संबंधीत लेख, वर्तमानपत्रे आणि पुस्तकांचाही दुय्यम माहितीसाठी उपयोग करण्यात येईल. संदर्भ वर्षे म्हणून 2002-03 ते 2011-12 असा दहा वर्षांचा कालखंड राहील. या पेपरव्दारे प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची कामगिरीचे मूल्यांकन केले जाईल. मुख्यत्वेकरुन प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची गेल्या दहा वर्षातील वाढ, सभासद संख्या, एकूण ठेवी, कर्जाची मागणी, कर्ज पुरवठा, कर्जाची थकबाकी, परतफेड न झालेले कर्ज अशा अनेक घटकांवर प्रकाश टाकण्यात येईल व अभ्यासात समाविष्ट असतील.

*निष्पत्ती आणि चर्चा :–*


भारतातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कृषी पतपुरवठा करण्यात महत्वाची भुमिका पार पाडीत आहेत. या संस्था भारताच्या सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी आहेत. भारतातील चार सहकारी संस्थापैकी एक प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था निदर्शनास येते. प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था म्हणजे अशा संस्था की ज्या शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या आहेत. व शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी स्थापन केलेल्या आहेत.

### कोष्टक – अ
### 2002-03 ते 2011-12 या काळातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची संख्या

| वर्ष | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| २००२-०३ | ११२३०९ | ११.२१ |
| २००३-०४ | १०५७३५ | १०.५६ |
| २००४-०५ | १०८७७९ | १०.८६ |
| २००५-०६ | १०६३८४ | १०.६२ |
| २००६-०७ | ९७२२४ | ९.७१ |
| २००७-०८ | ९४९५० | ९.४८ |
| २००८-०९ | ९५६३३ | ९.५५ |
| २००९-१० | ९६६४७ | ९.४५ |
| २०१०-११ | ९३४१३ | ९.३३ |
| २०११-१२ | ९२४३२ | ९.२३ |
| एकूण | १००३५०६ | १००.०० |

संदर्भः– नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को–ऑपरेटिव्ह बॅंक लि.

### कोष्टक – अ
### 2002-03 ते 2011-12 या काळातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची संख्या (टक्केवारीत)




वरील कोष्टक व आलेख दर्शवितात कि, 2002.03 या वर्षात सर्वात जास्त प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था स्थापन झालेल्या आहेत. मात्र 2011.12 या वर्षाशी तुलना करता प्राथमिक कृषी पतसंस्थांची संख्या कमी झालेली आहे. 2002.03 या वर्षी टक्केवारी 11º21 आहे. तर 2011.12 टक्केवारी 9º23 इतकी कमी झाली आहे. 2002.03 या वर्षाच्या तुलनेत कमी टक्केवारी दिसुन येते. कोष्टकावरुन स्पष्ट होते की, 2002.03 या वर्षी सर्वात जास्त प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था स्थापन झालेल्या आहेत. 2002.03 ते 2011.12 या दहा वर्षातील सर्वात जास्त वाढ आहे. मात्र 2011.12 या वर्षी दहा वर्षातील सर्वात कमी 9º23 वाढ दिसून येते.


### कोष्टक – ब
### अनुसूचित जाती (एस.सी.) व अनुसूचित जमाती (एस.टी.) एकूण सभासदांसंबंधी माहिती

| वर्ष | एकूण सभासद | टक्केवारी | अनुसूचित जाती (एस.सी.) | टक्केवारी | अनूसूचित जमाती (एस.टी.) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २००२-०३ | १२३५५२ | ९.७६ | ३३१८४ | १२.८ | १२०२१ | १०.९१ |
| २००३-०४ | १३५४११ | १०.७० | ३०६१४ | ११.१४ | ११८८९ | १०.७९ |
| २००४-०५ | १२७४०६ | १०.०७ | ३०९३४ | ११.२६ | ११७९९ | १०.७१ |
| २००५-०६ | १२५१९७ | ९.८९ | ३०५७९ | ११.१३ | ११६६४ | १०.५९ |
| २००६-०७ | १२९७९२ | १०.२५ | २९२५८ | १०.६५ | १११२७ | १०.१० |
| २००७-०८ | १३१५३० | १०.३९ | २९७२५ | १०.८२ | १११९९ | १०.१६ |
| २००८-०९ | १३२३५० | १०.४५ | २८४९५ | १०.३८ | १०१२७ | ९.१९ |
| २००९-१० | १२६४१९ | ९.९८ | २६०८२ | ९.५० | १०५१५ | ९.५४ |
| २०१०-११ | १२१२२५ | ९.५६ | १५३८५ | ५.६१ | ९८०७ | ८.८९ |
| २०११-१२ | ११३५९६ | ८.९५ | २०३४० | ७.४३ | १००५९ | ९.१२ |
| एकूण | १२६६४७८ | १००.०० | २४४५९६ | १००.०० | ११०२०७ | १००.०० |

*संदर्भ – नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को– ऑपरेटिव्ह बॅंक लि.*

### *कोष्टक – ब*

२००२-०३ ते २०११-१२ या काळातील एकूण सभासद, अनुसूचित जाती व अनुसूचति जमाती माहिती (टक्केवारीत)




कोष्टक – ब मध्ये प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांमधील वर्गानुसार सभासद संख्या दिलेली आहे. या पतपुरवठा संस्थामधील एकूण सभासद संख्येत 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षांच्या काळात 2002-03 या वर्षी 10.70 टक्के सर्वात जास्त वाढ झाली. तर सर्वात कमी वाढ 2011.12 या वर्षी 8०95 टक्के दिसून येते. अनुसूचित जाती (एस.सी.) सभासदांची 2002-03 या वर्षी सर्वात जास्त 12.8 टक्के वाढ झालेली आहे. तर सर्वात कमी 2010-11 या वर्षी 5.61 टक्के वाढ झाली. कोष्टकावरुन निदर्शनास येते की, अनुसूचित जातीच्या सभासदांची वाढ ही 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षात कमी होत गेलेली दिसते. त्याच प्रमाणे अनुसुचित जमातीच्या सभासद संख्येची वाढ लक्षात घेता सर्वात जास्त 2002-03 या वर्षी 10.91 टक्के दिसून येते. तर सर्वात कमी 2011-12 या वर्षी फक्त 8.89 टक्के एवढीच वाढ झाली आहे. मात्र 2010-11 च्या तुलनेत 8०89 टक्के वरुन 2011-12 या वर्षी 9.12 टक्के अशी अल्पशी वाढ झालेली आहे.

### *कोष्टक – क*
### *प्राथमिक कृषी पतसंस्थेतील ठेवी, कर्ज आणि खेळते भांडवल विषयी महिती*

| वर्ष | एकूण ठेवी | टक्केवारी | एकूण कर्ज | टक्केवारी | खेळते भांडवल | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २००२-०३ | १९१२०२३ | ६.९८ | ३०२७७९१ | ६.३० | ६११४२४३ | ६.२७ |
| २००३-०४ | १८१४२५३ | ६.६२ | ३४२५७१८ | ७.१३ | ६२०४६८५ | ६.३६ |
| २००४-०५ | १८९७६०४ | ६.९२ | ४०२४९४९ | ८.३८ | ७५४०७४१ | ७.७३ |
| २००५-०६ | १९५६११९ | ७.१३ | ४१०१७६० | ८.५४ | ७३३८६६७ | ७.५२ |
| २००६-०७ | २३४८४०७ | ८.५६ | ४३७१४४९ | ९.१० | ७९९५८६९ | ८.१९ |
| २००७-०८ | २५४४९२६ | ९.२८ | ४७८४७९७ | ९.९६ | ८८१०६८५ | ९.०२ |
| २००८-०९ | २६२४५३८ | ९.५७ | ४८९३८४४ | १०.१९ | ९४५८४८८ | ९.६८ |
| २००९-१० | ३५२८६०७ | १२.८७ | ५१७६३९० | १०.७८ | १३५१९१५२ | १३.८४ |
| २०१०-११ | ३७२३८१६ | १३.५८ | ५४०००१० | ११.२५ | १४४२२१९० | १४.७६ |
| २०११-१२ | ५०२५२७९ | १८.३३ | ८८८३५५७ | १८.५१ | १६०५०७९७ | १६-४३ |
| **एकूण** | **२७३७५५७२** | **१००.००** | **४८०९०२६५** | **१००.००** | **९७४५५५१७** | **१००.००** |

संदर्भः– नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को–ऑपरेटिव्ह बॅंक लि.

कोष्टक – क भारतातील प्राथमिक कृषी पतसंस्थ्यांच्या ठेवी, कर्ज आणि खेळते भांडवली विषयी महिती दर्शवित आहे. दहा वर्षाच्या दरम्यान 2002.03 ते 2011-12 एकूण 6०98 टक्के वरुन 18.33 टक्के ठेवीत वाढ झालेली आहे. तसेच एकूण कर्ज 6.30 टक्के वरुन 18.51 टक्के पर्यंत वाढले आहे. ठेवी व कर्जाची वाढ जलद गतीने झालेली आहे. भांडवलाचीही या कालावधीत लक्षणीय वाढ झालेली आहे. 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षाच्या काळात 6.27 टक्के पासून 16.43 टक्के वाढ नोंदविली गेली आहे.

***कोष्टक – ड***


***वाटप कर्ज व थकबाकी कर्जाविषयी माहिती***

| वर्ष | वाटप केलेले कर्ज | टक्केवारी | थकबाजी कर्ज | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २००२-०३ | ३३९९५८६ | ५.७५ | ४२४११२४ | ६.७२ |
| २००३-०४ | ३५११९२४ | ५.९४ | ४३८७२८२ | ६.९५ |
| २००४-०५ | ३९२११७२ | ६.६३ | ४८७८५४६ | ७.७३ |
| २००५-०६ | ४२९१९५९ | ७.२६ | ५१७७८६६ | ८.२० |
| २००६-०७ | ४९६१२७५ | ८.३९ | ५८६२०१५ | ९.२८ |
| २००७-०८ | ५७६४२४८ | ९.७५ | ६५६६६३८ | १०.४० |
| २००८-०९ | ५८७८६७४ | ९.९४ | ६४०४४२४ | १०.१४ |
| २००९-१० | ७४९३७५४ | १२.६७ | ७६४७९८३ | १२.११ |
| २०१०-११ | ९१३०३८२ | १५.४४ | ८७७६७९४ | १३.९० |
| २०११-१२ | १०७३००२३ | १८.१५ | ९१२४३२१ | १४.४५ |
| **एकूण** | **५९१०८२९९७** | **१००.००** | **६३०६६९१३** | **१००.००** |

*संदर्भ :– नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को–ऑपरेटिव्ह बॅंक लि.*

***`कोष्टक – ड***

२००२-०३ ते २०११-१२ या काळातील वाटप कर्ज व थकबाकी कर्जाविषयी माहिती (टक्केवारीत)




कोष्टक – ड वाटप केलेले कर्ज आणि थकबाकी कर्ज दहा वर्षांची आकडेवारी रक्कमेत व टक्केवारीत दर्शवित आहे. भारतातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांनी 2002-03 ते 2011-12 या कालावधीत 5.75 टक्के ते 18.55 टक्के पर्यंत कर्ज वाटप केलेले आहे. 2002-03 ते 2011-12 या कर्ज वाटपाचे प्रमाणाबरोबरच थकबाकीच्या प्रमाणातही वाढ झालेली दिसून येते.

**कोष्टक – इ**


**एकूण वसूल कर्ज व एकूण थकित कर्जाची 2002-03 ते 2011-12 या कालावधीतील माहिती**

| वर्श | एकूण वसूल कर्ज | टक्केवारी | एकूण थकित कर्ज | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २००२-०३ | २५०५१३३ | ५.७१ | १५२८९३७ | ६.७३ |
| २००३-०४ | २७९४१६० | ६.३७ | १६२९५१७ | ७.१७ |
| २००४-०५ | ३१७३३०५ | ७.२३ | १६०५२२३ | ७.०६ |
| २००५-०६ | ३५५०३२५ | ८.०९ | १५४७६२३ | ६.८१ |
| २००६-०७ | ३८३६०७३ | ८.७४ | १५७५१५० | ६.९३ |
| २००७-०८ | ४३२८९४७ | ९.८६ | २४००३४८ | १०.५६ |
| २००८-०९ | ४६६९७६४ | १०.६४ | ३७९३६३५ | १६.६९ |
| २००९-१० | ५५९७२६० | १२.७५ | ३९५२४०० | १७.३९ |
| २०१०-११ | ६७५४३२३ | १५.३९ | २२६९७१३ | ९.९९ |
| २०११-१२ | ६६४४४३९ | १५.१४ | २४३०३५९ | १०.७० |
| **एकूण** | **४३८५३७२९** | **१००.००** | **२२७३२९०५** | **१००.००** |

*संदर्भ :– नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट को–ऑपरेटिव्ह बॅंक लि.*

कोष्टक – इ

२००२-०३ ते २०११-१२ या काळातील वसूल कर्ज व एकूण थकित कर्जाची माहिती (टक्केवारीत)




कोष्टक – इ आणि आलेख एकूण वसुल झालेले कर्ज व एकूण थकित कर्ज वर्षनिहाय दाखवित आहेत. एकूण कर्जाची वसूली 2002-03 मध्ये 5.71 टक्के होती. त्यानंतर 2011-12 पर्यंत प्रत्येक वर्षी एकूण वसूल कर्जाच्या टक्केवारीत वाढ होत गेली. 2011-12 या वर्षी एकूण कर्जाची वसूली 15.14 टक्के झाली एकूण थकीत कर्जपेक्षा 2004-05, 2005-06, 2006-07, 2010-11 आणि 2011-12 या वर्षामध्ये एकूण थकीत कर्जाच्या टक्केवारीपेक्षा एकूण कर्जाच्या वसूलीची टक्केवारी जास्त आहे. 2002-03 या वर्षी थकीत कर्ज 6.73 टक्के होते. त्यात वाढ होऊन 2011-12 या वर्षी 10.70 टक्के एकूण थकित कर्ज होते.

*निष्कर्ष :–*

1.भारतातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था सकारात्मक स्वरुपाचे कार्य करीत आहेत. 2002-03 ते 2011-12 या काळात या संस्थांची स्थापना नकारात्मक असली तरी एकूण सभासद संख्येत भरीव वाढ झालेली दिसून येते.
2.प्राथमिक कृषी पतपूरवठा सहकारी संस्थांमध्ये अनुसुचित जाती (एस.सी) आणि अनुसुचित जमाती (एस.टी.) सभासदांची संख्या 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षांच्या काळात वेगाने वाढलेली आहे.
3.प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थामध्ये एकूण सभासद संख्येत दहा वर्षाच्या कालखंडात वाढ झालेली आहे. यावरुन या संस्थांविषयी शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण होत आहे. या संस्थाव्दारे शेतकऱ्यांना पतपुरवठा योग्य वेळी होत आहे. त्यामुळे शेतकरी या संस्थांचे सभासद होणे पसंत करीत आहेत. असे असले तरी दहा वर्षात पाहिजे त्या प्रमाणात एकूण सभासद संख्येत वाढ झालेली नाही. 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षांच्या काळात 2002-03 या वर्षी 9.76 टक्के वाढ होती. 2005-06 हे वर्ष वगळता 2009-10 पर्यंत सभासद संख्येत वाढ होत गेली. मात्र 2010-11 आणि 2011-12 या

वर्षी टक्केवारीत घट झालेली आहे. या वरुन शेतकऱ्यांना काही प्रमाणात इतर संस्थाकडून पतपुरवठा होत असावा याची शक्यता नाकाराता येत नाही. 2002-03 ते 2009-10 या दरम्यान सभासद संख्येत 9.76 टक्के ते 9.98 टक्के वाढ झालेली आहे.

4.प्राथतिक कृषी पतपुरवठा संस्थांमध्ये 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षांत एकूण ठेवींच्या प्रमाणात भरीव वाढ झालेली आहे. या दहा वर्षांच्या काळात 6.98 टक्के ते 18.33 टक्के अशी सकारात्मक वाढ एकूण ठेवींमध्ये नोंदविली गेली. एकूण ठेवींच्या बाबतीत या संस्थांना शेतकऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळालेली आहे. या वरुन शेतकऱ्यांना आपला पैसा प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेत ठेवी म्हणून ठेवणे विश्वासपात्र वाटते.

5.भारतीय प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांकडून देण्यात येणाऱ्या एकूण कर्जातही दहा वर्षांच्या कालखंडात भरीव वाढ झालेली आहे. 2002-03 ते 2011-12 या दरम्यान 6.27 टक्के ते 18.51 टक्के एवढी वाढ नोंदविली गेली आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळी व अल्प दरात पतपुरवठा या संस्थांमार्फत होत असल्यामुळे पतपुरवठयाची टक्केवारी 2002-03 ते 2011-12 या काळात वाढत गेलेली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांना आपल्या शेतीच्या मशागतीसाठी झालेला आहे.

6.प्राथतिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या 2002-03 ते 2011-12 या दहा वर्षाच्या काळात खेळते भांडवलात वाढ झालेली आहे. 6.27 टक्के ते 16.43 टक्के इतकी वाढ दहा वर्षाच्या काळात खेळते भांडवलात झाली.

7.वाटप झालेले कर्ज व थकबाकी कर्ज दोन्ही खात्यातील अंतर कमी झालेले आहे. यावरुन शेतकरी प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या कर्जाची परतफेड वेळेवर करीत आहेत.

8.शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड केलेली असली तरी एकूण थकीत कर्जाचे प्रमाण वाढलेले आहे. यावरुन शेतकरी कर्जाची परतफेड करीत असले तरी वेळेच्या आत किंवा देय तारखेपर्यंत कर्जाची परतफेड करीत नाहीत. त्यामुळे थकीत कर्जात वाढ झालेलली आहे.

9.प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचा जलद गतीने विकास होत आहे. दिवसेंदिवस शेतकऱ्यांमध्ये या पतपुरवठा संस्थाची लोकप्रियता वाढत आहे. या संस्थांच्या वाढीची शेकडेवारी कमी नोंदविली गेली तरी या संस्थांमध्ये सभासद संख्येत वाढ होत आहे. त्याचप्रमाणे एकूण ठेवींमध्येही वाढ होत आहे.

10.भारतातील कृषी पतपुरवठा सहकारी संस्थानी कामगिरी अधिक चांगली दिसुण येत नसली तरी सा संस्थांचे कामगिरीचे चित्र प्रगती आणि विकासाचे दिसते.

*संदर्भ :–*

1.S.S. Achary – Agricultural Marketing in india, Oxford and IBH publishing co. pvt.ltd, Culcutta.

2.Co-operative marketing in india – Pitaliya Pustak Bhandar University of Michigan.

3.Agriculture and Rural Development in india – Since 1947, New century publication,2006

4.B.B.Gosh – Problems of Rural credit in India, Calcutta 1948

5.Performance of primary agricultural societies – National Federation of State Co-operative Bank ltd. Mumbai, 2002-03 to 2010-11

6.प्रा.डॉ.स.श्री.मु. देसाई, प्रा.सौ. निर्मल भालेराव – कृषी अर्थशास्त्र आणि भारतातील शेती व्यवसाय – निराली प्रकाशन, पुणे.

7.NABARD – Annual report 10-11, National Bank for agriculture and rural development.